# पंडित जवाहरलाल नेहरू

(दि.१४ नोव्हेंबर, १८८९ ते दि. २७ मे, १९६४)

(अल्प परिचय)

पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरू, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म अलाहाबाद येथे झाला असून, त्यांचे प्राथमिक शिक्षण अलाहाबाद येथे झाले. जवाहरलाल पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडमधील हॅरो या प्रसिध्द विद्यालयात दोन वर्षे शिक्षण घेऊन पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ट्रिनिटी महाविद्यालयात (केंब्रिज विद्यापीठ) ते दाखल झाले.

महात्मा गांधीजींनी सन १९२१ मध्ये सुरू केलेल्या असहकार चळवळीच्या वेळी जवाहरलाल नेहरू यांना अटक झाली. पुढील २५ वर्षात जवाहरलाल यांनी अनेकवेळा तुरूंगवास भोगला असून एकूण १५ वर्षे त्यांनी तुरूंगात काढली. सन १९४२ च्या भारत छोडो चळवळीच्या वेळी जवाहरलाल नेहरू यांनी अहमदनगरच्या किल्यात जवळजवळ तीन वर्षे अखेरचा तुरूंगवास भोगला होता.

दिनांक १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वतंत्र भारताचा उदय झाला आणि जवाहरलाल हे स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय पंतप्रधान झाले. जवाहरलाल यांच्या पंतप्रधान पदाच्या कालावधीत स्वतंत्र भारताचे संविधान तयार झाले व संसदीय लोकशाही शासन प्रणाली अस्तित्वात आली. हिंदू कोडबील मंजूर होऊन हिंदू महिलांना वारसा-घटस्फोटाचे हक्क मिळाले. संविधानात अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद करण्यात आली. भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले. महिला, अस्पृश्य व अल्पसंख्यांक यांना समान दर्जा आणि समान संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संविधानात तरतूद करण्यात आली. जवाहरलाल यांच्या पुढाकाराने नियोजन मंडळाची स्थापना होऊन भारतात आर्थिक नियोजनाचे युग सुरू झाले. पहिली व दुसरी अशा दोन पंचवार्षिक योजना त्यांच्या कारकिर्दित पूर्ण झाल्या.

जवाहरलाल यांनी गोवा, दीव, दमण याचा भारताच्या संघराज्यात समावेश करून घेतला. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जवाहरलाल यांच्या कारकीर्दीत निर्माण झाला. आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील लोकभावना लक्षात घेऊन त्यांनी राज्यांची भाषावार राज्यपुनर्रचना घडवून आणली. जवाहरलाल नेहरू यांनी शिक्षण व तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी देशात अनेक संशोधन संस्था व राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन केल्या. त्यांच्या प्रोत्साहनाने देशात अणुसंशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. अणुशक्तीचा वापर शांततामय कारणासाठी व्हावा असे त्यांचे ठाम मत होते. भारताला अणुयुगात आणण्याचे श्रेय पंडितजींनाच द्यावे लागेल.

नेहरूंनी केलेले ग्रंथलेखन इंग्रजीत असून ते कारागृहातच झालेले आहे. यामध्ये ग्लिम्पसेस ऑफ द वर्ल्ड हिस्ट्री, जवाहरलाल नेहरू : ॲन ऑटोबायग्राफी व डिस्कव्हरी ऑफ इंडिया हे त्यांचे तीन ग्रंथ विशेष महत्वाचे मानले जातात. सन १९५५ या वर्षी जवाहरलाल नेहरू यांना भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. दिनांक २७ मे, १९६४ रोजी त्यांचे दिल्ली येथे निधन झाले. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म दिवस देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो.

**********

स्त्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ